ध्यानी मनी नसतांना एखादी गोष्ट
घडली की आपल्याला त्याचे फार अप्रुप वाटते. सुशीला चि. विकास
मिन भारतात येतात आम्हाला भेटून जातात प्रत्येक वेळी ते आम्हाला
बोलावतात. थोडे दिवसापूर्वी आम्ही उभयता अमेरीकेला गेलो होतो
तेव्हां ती सर्व मुले एकत्र रहात होती. आम्ही त्यांचे जवळ राहिल्या
मुळे त्यांना आम्ही आईवडीलांचे ठिकाणी होतो व सगळ्या नात्यांनी
ती आमची मुलेच झाली. इथे आली की, काका काकू तुम्ही याना
तिकडे असे त्यांनी म्हणायचे व आम्ही येऊ ना! असे चालायचे.
पण ह्या खेपेला अभय-तनुजांनी विकासला फोनवरून
नक्की पाठवच म्हणून आग्रह धरला व विकासने निर्णय घेतला.
एखादी कोणतीही गोष्ट मनांत आली की ती लवकरांत लवकर
अमलांत आणायची हा विकासचा स्वभाव! लगेच अभय-तनुजाच्या
फोन काकू, तुम्ही येण्याचे तिकीट ओपन इथे ठेवा. येणे तुमच्या
हातात व परतणे आमच्या!!

परदेश गमनाची तयारी सुरु. पासपोर्ट
व्हीसा पूर्वी होतेच ते रिन्यू करुन घेतले. तिकीटे आली.
कागद पत्रे त्यासाठी वरचेवर वेगवेगळ्या ऑफीसमध्ये जाणे
सर्व माहिती घेणे हे सर्व त्यांनी उत्साहाने केले. पुन्हा
तिकडे नेण्याच्या वस्तू, लहानमोठी खरेदी सर्व भराभर झाले
अभयच्या आई-वडीलांना (ते इथे असतात) भेटून आलो
आणि निघण्याचा दिवस उजाडला.

दिनांक 30 मार्च दुपारी ४ वाजता घर ते
एअरपोर्ट (सॅंडी) कंपनीची गाडी दारांत हजर! चि. अमीत माझा
नातू उत्साहात सहभागी. "आजी हे घेतलंस का? आजोबा
मला काही तरी चांगली वस्तू आणा हं! इतक्यात चि. राजू
आत्याचे (प्रो. दैठणे) आम्हाला निरोप द्यायला आला व म्हणाला,
काकू, तुम्हाला वाटेत खायला (लहान लाडू मूग लाडू) हा घेता
आणि प्रवासी टिपणी लिहायला ही डायरी. नेमकीच भेट दिली
धन्य वाटले. ठीक ५ वाजता गाडी निघाली वाटेत लोणावळ्याला
चहा वगैरे घेऊन पुढे निघालो.

मुंबई जशी जवळ आली तसे जवळून जात असलेल्या टेरेसवरून "स्वातीने" हात केला, तीही आम्हाला निरोप द्यायला खाऊ घेऊन आली. बरोबर वेळेवर पोहोचलो. एअरपोर्टवर गजबजाट होता इतक्यात "संजय आला. ही सर्व आमची मुलेच) आम्ही बॅगेज क्लेम करून पुन्हां बाहेर आलो. विकास, संजय, स्वाती सर्वजण रेस्टॉरंटमध्ये गेलो.

मोठे, सहार अेअरपोर्टचे रेस्टॉरंट, अेअरकंडीशन्ड, सर्वत्र स्वच्छता, वेटर्सची लगबग, खाद्यपदार्थांचे गंध, सुसज्ज टेबल, उंची क्रोकरीचा थाट व सर्वत्र चकचकाट. आम्ही सर्वजण अेकत्र बसलो. स्वातीने पिझ्झा मागवला, पिझ्झा- त्याची आरासही छान होती, पण संजय व त्याच्या मिसेसने पाठविलेली पोळी- भाजी त्याची गोडी अवीट होती. (आमच्या कोल्हापुरी भाषेत "शिदोरी) म्हणाना) त्याचा सर्वांनी यथामत्ता उडविला. अवदाता सुखी भव म्हणत आशीर्वाद देऊन परत आलो. सर्वांचा निरोप घेतला. मुले आपल्या पासून दूर जातात- येतात पण आपण त्यांना सोडून जाताना वाईट वाटते हे दुःख होतेच पण दुसऱ्या मुलांजवळ निघालो हाही आनंद होता.

ब्रिटिश अेअरवेजचे विमान - कस्टम्स, इमिग्रेशन हे सर्व सोपस्कार होईपर्यंत पहाटे २-२५ ला विमानाने टेक ऑफ घेतला. विमान मोठे ४०० च्यावर प्रवासी, प्रत्येक खुर्चीला म्युझिक चॅनेल्स, समोर स्क्रीनवर सीट बेल्ट इमर्जन्सी जॅकेट वापरण्याचे प्रात्यक्षिक सर्व दाखविले व सिनेमा चालू झाला. माझी विंडो सीट होती त्यामुळे बाहेर चंद्र तारे व खाली ढग मध्ये आमचे विमान होते. ऑरेंज ज्यूस घेऊन सर्वजण निद्रेच्या आधीन झाले. पहाटे जाग येताच कॉफी नाश्ता घेतला आणि अनाउन्समेंट आली. बेल्ट बांधून खिडकीतून पाहिले सुंदर दृश्य! विमान लँड झाले. लंडनचे प्रसिद्ध विमानतळ "हिथ्रो"! माझ्या घड्याळात तेव्हां सकाळचे १० वाजले होते. पण अक्षांश रेखांशाच्या बदलानुसार घड्याळ पुढे मागे करत्ते त्यांच्या घड्याळात सकाळचे ६ वाजून ४५ मिनिटे झाली होती. हातातील बॅगेसहित विमानाच्या दाराशी आलो. व्यवस्थित प्रवास झाला म्हणून आणि उत्तम सेवा दिली म्हणून वैमानिक व अेअरहोस्टेसचे आभार मानायचे सोडून त्यांनीच आम्हाला "थँक्यू" म्हटले. हा रिती रिवाजाचा वेगळा पैलू पहायला मिळाला.

पुढे आलो. लंडनच्या विमानतळ, स्वच्छ सुसज्ज! टॅक्स फ्री दुकाने चित्रासारखी लावलेली होती. कुठेही गडबड गोंधळ नाही. सहा तासांचा ब्रेक होता, टेन्शन नव्हते, बॅगेज परस्पर दुसऱ्या विमानांत जाणार होते. फ्रेश होऊन मॅकडोनॉल्ड मध्ये फ्रेंचफ्राय कॉफी घेऊन मजेनं हिंडत सर्व दुकाने पाहिली. खरेदी परत आल्यावर करता येईल म्हणून सारंगसाठी (अभयचा मुलगा) छोटी कार व लंडन बॉबी खरेदी केला. बारा वाजता इमर्जन्सी गेटने बाहेर येऊन छोट्याशा बसने विमानापर्यंत आलो आणि जिन्याने विमानांत चढलो. नवी लुफ्तान्सा, एअर शिकागो, ब्रिटीश एअरवेज भरपूर विमाने जात येत होती अव्याहत व्यवहार चालू होते पण कुठेही गडबड गोंधळ नाही.

विमान बरेच मोठे होते. यात बहुतांशी इंग्लीश, थाई, जपानी, चिनी, सर्व तऱ्हेचे लोक होते. इंडीयन स्त्रीया मात्र कुठेही दिसल्या नाहीत. एअरहोस्टेस ने आमचे स्वागत केले. रेमाना नावाच्या एअरहोस्टेसने माझी सर्व चौकशी केली तिला माझी साडी खूप आवडली ती म्हणाली तुला चालताना या साडीचा अडथळा वगैरे होत नाही का? नर्सेच तिथल्या इतरही स्त्रिया गमतीने पहात होत्या. कारण त्या सर्व स्कर्ट आणि जीन्स मध्येच होत्या. आमचे लंच वगैरे आले. आमच्यासाठी इंडीयन फूड होते. हळू हळू निद्रेच्या आधीन होत होतो. विमान अटलांटीक महासागरावरून जात होते खाली सागर व वर आकाश मध्ये आम्ही आणि एकदम विमान थरथरु लागले आणि जोरात हलू लागले. सर्वांना बेल्टस् लावायला सांगितले, एअर होस्टेसचे धावपळ व घाबरलेले चेहरे दिसत होते. ~~पण~~ ~~एकदम~~ मी मनांत म्हटले की देवाच्या मनांत असेल तसे होईल, दोघे बरोबर आहोतना! दोघांचे एकदम होणे हे भाग्यच! पण हळू हळू विमान आणखी वर नेले आणि सर्व स्टेडी सुरु झाले. (सागरांत होणाऱ्या वादळाने असे असावे) पुन्हा कॉफी-ज्यूस आले आणि उतरण्याची वेळ आली.

विमान स्थळ्हळू खाली आले संध्याकाळचे सहा वाजले होते. खिडकीतून बाहेरचे सृष्टीसौंदर्य दिसू लागले. सिॲटल हे निसर्गसौंदर्याने नटलेले शहर. विमानतळ (आलास्का) आले सर्व सोपस्कार झाले. तिथे इमिग्रेशनला अेक गुजराथी मुलगी होती तिने आमच्याबरोबर खूप गप्पा मारल्या. शेवटी परदेश ते परदेशच तिथे आपली माणसे भेटली की त्यांना खूप आपलेपणा व आनंद वाटतो. मुख्य दरवाजाशी आलो तर अभय पांढ-याशुभ्र व पिवळ्या शेवंतीचा सुगंधी गुच्छ घेऊन उभा होता. त्यांना "काका वेलकम् टु सिॲटल्" म्हणाला व मला मिठीच मारली. सर्वांना खूप आनंद झाला.

आम्ही बाहेर आलो तर अेअरपोर्टच्या इमारतीच्या सातव्या मजल्यावर अभयची गाडी होती. इथे गाडी पार्कींगला वेगवेगळ्या इमारती असतात. आम्ही सामानाच्या गाडीसगट सर्वजण लिफ्टमधून त्यामजल्यावर गेलो यावरुन लिफ्टची क्षमता दिसून येते. संध्याकाळ झाली होती आणि आपल्या भाषेत दिवेलागण झाली होती. घरी आलो सौ. तनुजाने स्वागत केले. सारंग नुकलाच पाळणाघरांतून आला होता, तनुजा ऑफीसमधून आली होती. आणि आल्यावर त्यांना आई-वडील भेटले होते. सारंग सर्वांशी अेकरुप होऊन गेला. आमची जेवणे झाली सर्वांच्या अेकमेकांच्या भेटीनेच पोटे भरुन गेली होती.

अभय- तनुजाचा छोटासा बंगला खूप छान आहे पुढे मागे लॉन, फुलझाडे कारपार्कींग आणि सर्व सोईंनी युक्त घर. सुरवातीला मोठा हॉल, किचन, डायनींग वर तीन बेडरुमस !! सर्वत्र गालिचे, कपडे ठेवण्यासाठी छोट्या खोल्या, स्वयंपाकघरांत गॅस, हॉटप्लेट, ओव्हन, मायक्रोवेव्ह, डिश वॉशर, गोदरेज कपाटाअेवढा मोठा फ्रीज हे सर्व अंतर्भूत असते. त्यामुळे सर्व सुविधा असतात म्हणून त्रास होत नाही. संध्याकाळचे ८ वाजून गेले तरी सूर्यास्त झाला नव्हता. आम्ही ^ थोड्या गप्पा करुन झोपेच्या आधीन झालो. आमची व्यवस्था ^मग उत्तम ठेवली होती.

सकाळी फिरायला जाण्याचा नियम इथेही.

चालूच ठेवला होता. थंडी खूप त्यामुळे गरमकपडे सतत असत. सकाळी चिमण्यांचा चिवचिवाट, कोंबड्यांचे आरवणे पक्षांचा गुंजारव हे काहीच नव्हते त्यामुळे थोडीशी उदासीनता वाटे पण या हवेत ते जगूच शकणार नाहीत. फिरायला जाताना थोडे सुने असे. हळू हळू निवळे. छोटे-मोठे बंगले, शिस्तबद्ध, सर्वत्र लॉन, ट्युलीप्सची झाडे त्यांचे वेगवेगळे रंग, प्रत्येकाच्या घरापुढे वेगवेगळ्या रंगाच्या गाड्या, स्वच्छ व एकसारखे रस्ते त्यामुळे फिरायला फार बरे वाटायचे. रस्त्यांत कोणीही ओळखीचे असो नसो पण हाय, गुडमॉर्निंग म्हणणे हा रिवाजच होता. फिरण्यातून खूप काही गोष्टी पहायला व शिकायला मिळतात. लहानांतून फिरणे म्हणजे "पळती झाडे पाहूया" असेच काहीसे व्हायचे. पायी फिरण्यात जवळीक साधते हेच खरे!

सिॲटलमध्ये तर सर्वत्र हिरवेगार आणि निसर्गाने परीपूर्ण! स्प्रिंग सुरू झाला होता त्यामुळे हवाही छान. साधारणतः दोन भागामध्ये व मध्ये वॉशिंग्टन लेक. सिॲटल हे दोन गोष्टींसाठी प्रसिद्ध एक बिल गेटचे मायक्रोसॉफ्ट व दुसरे लाकूड. सौ. तनुजाचा जॉब मायक्रोसॉफ्टमध्ये आहे. आम्ही सर्व ऑफीस हिंडून पाहिले. त्याची जवळ जवळ ३० ठिकाणी सध्यां ऑफीसेस आहेत आणि प्रत्येक ऑफीसमध्ये २००० लोक काम करीत आहेत. अथायन्चा कॉम्प्युटरचा स्वतंत्र व्यवसाय आहे. सिॲटलचे लाकूड प्रसिद्ध. भरपूर जंगले, नवीन नवीन निर्माण करतात आणि त्याचा उपयोग सर्वत्र करतात. इथे इमारती सर्वत्र लाकडाच्या असतात लाकडावर काही प्रक्रीया करतात त्यामुळे सडणे, कुजणे वगैरे खराब होत नाही. सर्व बंगले ऑफीसेस लाकडी व आवश्यक तिथे सिमेंट पिलर्स आणि स्टील वापरतात बरेच काचेचे असते. त्यामुळे बांधकामाला वेळ लागत नाही. सर्व यांत्रिक असून दारे, विमाने यांचे फर्निचर बनविण्याचे मोठे मोठे कारखाने आहेत आणि लाखो मजूर इथे काम करीत असतात. लाकडाचा रंग आकर्षक व अतिशय गुळगुळीत कठीण असते. स्वयंपाकाचे ओटे सुद्धा लाकडी असतात.

पहिल्याच रविवारी आम्ही स्पेसनिडल पहायला गेलो.
५५०० फूट उंच असलेला वर सॉसरचा आकार असलेला मोठा खांब
त्याला तयार करायला २५० मिलियन डॉलर्स खर्च केला आहे. त्याला
दहा मजले असून प्रत्येक मजल्यावर हॉटेल्स, दुकाने, म्यूझीयमस
आहेत. तसेच छोट्या वस्तूंची डीपार्टमेंटल स्टोअर्स आहेत. स्पेसनिडल
चे चित्र असलेल्या वस्तू स्टीकर्स, टीशर्ट, पिशव्या, कॉइनस
पर्स वगैरे विकायला ठेवलेल्या आहेत. वर जाण्यासाठी लिफ्टची
सोय आहे. वरती शेवटी गच्ची असून तेथे दुर्बीणी बसविल्या
आहेत तेथून संपूर्ण सिॲटलचे दर्शन होते. तिथे सध्या एका मजल्याचे
रंगकाम चालू आहे आणि संपूर्ण होण्यासाठी अर्धाच वर्ष लागतील
असे चौकशी अंती समजले. अर्थात तिथे सर्व मशीनच्या सहाय्याने
असते म्हणून आपल्याकडे किती दिवस लागतील याची
कल्पनाच करवत नाही. वॉशिंग्टन लेकही खूप मोठा आहे.
ते पाहून खाली आलो तिथे सेंटरपार्क आहे. अपेक्षाप्रमाणे
पाळणे खेळणी खाण्याच्या पदार्थांचे स्टॉल्स आहेत पण
अत्यंत पद्धतशीर आहे. अमेरीकेत लहान मुलांना, वृद्धांना तसेच
अपंगांना अतिशय महत्व आहे. त्यांच्या सोईनुरूप सर्व
करमणुकीची व्यवस्था असते. सारंग भरपूर खेळला आम्ही
पिझा - मिल्कशेक घेऊन निघालो त्यानंतर एकाच मोठ्या
रुंद रुळावरून जाणाऱ्या "मोनोरेल" मधून फेरफटका केला
त्यातून डाऊनटाऊन सिॲटलही जाता येते. संध्याकाळी घरी
परतलो. इथले एक वैशिष्ट्य म्हणजे हवा चांगली आणि
धूळ प्रदूषण नाही त्यामुळे संध्याकाळी दमल्यासारखे
कंटाळवाणे होत नाही. तसेच कपडे खराब होत नाहीत.
त्या कारणास्तव दिवसभर ऑफीस काम करून सुद्धा पुन्हा तितक्याच
उत्साहाने घरकामे करतात.

दुसरे दिवशी संजय - सीमाकडे गेलो. हाही
माझ्या मुलाप्रमाणेच, संजय मायक्रोसॉफ्टमध्ये अधिकारी आहे.
सीमाही अर्धावेळ जॉब करून उरलेला वेळ मुलींचे सर्व
संगोपन करण्यामध्ये खर्च करते. संजय - सीमाचा बंगला
म्हणजे राजवाडाच ! संपत्ती आणि हौस यांचा सुरेख संगम !
मुलीही हुषार आहेत. त्यांचे अभिनंदन करून इडली - चटणी, पुलावखाना
(इंडीयन फूड) आस्वाद घेऊन परतलो.

यानंतर आमचे कॅनडामध्ये व्हॅन्कुअरला जायचे ठरले त्यासाठी व्हिसा काढणे आवश्यक होते सकाळी आम्ही ७॥ वाजता अभयच्या गाडीने ऑफिसमध्ये वेळेवर पोहोचलो. व्हिसासाठी मुंबईची परिस्थिती कशी आहे हे आपल्याला अनुभवाने ठाऊक आहेच. पण इथे एअरकंडीशनरूम, व्यवस्थित बसण्यासाठी जागा, खालच्या मजल्यावर, रेस्टॉरंट, क्यू सिस्टीम, अधिकाऱ्यांची बोलण्याची पद्धत छान असा हा जमीन अस्मानाचा फरक असलेला अनुभव, आम्ही घेतला. सकाळी ७॥ जाऊन १० वाजता व्हिसा घेऊन परत. शिवाय लाच नाही, त्रास नाही, टेन्शन नाही आणि आम्ही थँक्यू म्हणेपर्यंत त्यांनीच आम्हाला व्हॅन्कुअरच्या प्रवासाच्या शुभेच्छा दिल्या आणि "हॅव अ नाइस डे" म्हणाले.

१३ तारखेला सौ. तनुजाचा वाढदिवस. सकाळ पासून इंडीयातून (माझ्या मुलाचा) विकासचा फोन, तनुजाच्या आईवडीलांचे आणि अभयच्या आई-वडीलांचे फोन आले. आईवडीलांचा आणि अभयच्या आई-वडीलांचे फोन आले. चि. अभयने छानसा दिवसभर मैत्रिणींचे फोन येतच होते. चि. अभयने छानसा दिवसभर फैभिणींचे फोन येतच होते आम्हीही भेटवस्तू कोकोनट केक व पुष्पगुच्छ आणला होता आम्हीही भेटवस्तू शुभेच्छा देऊन उपमा आणि केक खाऊन दिवसाचा शुभारंभ केला. सारंग तर त्यानंतर जेव्हां जेव्हां केक खात असे तेव्हां हॅपी बर्थडे म्हणून टाळ्या वाजवत असे.

चि. अभयच्या गाडीने आम्ही व्हॅन्कुअरला निघालो. इथे सर्वांना गाड्यांची गरज असतेच. गाडी सर्व सोईंनी युक्त असते त्यामुळे चालविणाऱ्यांना व प्रवासकरणाऱ्यांना खूप आराम असतो. गाडीचे काम स्वतःच करावे लागते. इथे गॅस-पेट्रोलपंपावर माणसे नसतात आपणच जाऊन कॉईन टाकून स्वतःच गॅस भरावा लागतो. हवा चेक करावी लागते. अभय तनुजाने आपल्या गाड्यांतून म्युझिक सिस्टीममध्ये मराठी गाण्यांच्या कॅसेट्स ठेवल्या आहेत. त्यामुळे आपण इंडीयांत असल्याचा आभास निर्माण होतो. व्हॅन्कुअरला जात असतांना सकाळची वेळ दुतर्फा उंचचउंच झाडे, स्वच्छ रस्ता, मार्गाच्या वेगवेगळ्या पाट्या चुकणे तर शक्यच नाही. सर्वत्र हिरवेगार, उंच वृक्ष व विविध रंगांची फुलझाडे डोळ्याला सुखकारक वाटत होती. व कॅसेटवर लता मंगेशकर गात होती, "विश्वाचे आर्त माझ्या मनी प्रकाशले"

मधून मधून डोंगरावर बर्फ दिसत होते. तसेच इंद्रधनुष्यानेही हजेरी लावली होती. वारेन मॅकडोनलमध्ये फ्रेंच फ्राय व कॉफी घेतली पुढे निघालो. डोंगरांच्या मधून मधून गोलाकार रस्ते, दोन्ही बाजूला लाल, हिरवी, पिवळी पाने असलेली झाडे होती ते तर दृश्य अप्रतीम होते सर्व आखीव रेखीव होते पहाता पहाता व्हॅंकुअर आले आणि थांबलो. आणि त्याच वेळी सुरेश वाडकर गात होते, "देवाचिये द्वारी, शुभ्र चांदण्यांनी"

कस्टमसाठी तिथे रांग होती. पण लोकांनी गाड्यातूनच वेळ लावला होता. रविवार असल्यामुळे भरपूर गर्दी. कस्टम इमिग्रेशन झाल्यावर प्रमुख गेटपाशी आलो. अथांग सागर हा तर पॅसिफिक महासागर छोट्या मोठ्या बोटी, मोठी जहाजे सभोवती झाडे चित्रांतील दृश्ये प्रत्यक्षात अवतरली होती. नंतर तनुजाने दिलेल्या सॅंडविचचा आस्वाद घेऊन निघालो. मोठमोठे रस्ते कडेला छोटी घरे - लॉन फुलझाडे हे पहाता पहाता व्हॅंकुअर पार्कमध्ये आलो. तिथे अतिशय सुंदर होता. लाकूड, काच आणि स्टीलसारखी यापासून बनविलेला पुलावरून खाली पार्कमध्ये असलेली नदी, तळ काहीही दिसत नव्हते कारण खूप खोल व उंच झाडे यामुळे किनाराही दिसत नव्हता. बाजूला उंच डोंगर होते. तिथे जवळच म्युझियम होते. तिथे वेगवेगळ्या वस्तू होत्या. अभयने तनुजासाठी एक मग खरेदी केला. त्यानंतर स्टॅन्लेपार्क पाहून छोटी छोटी दुकाने पाहिली. ~~त्यानंतर~~ पुढे पॅसिफिक महासागराकडे गेलो. अथांग सागर मोठमोठ्या बोटी, काही छोट्या कारच्या डिझाइनच्या होत्या. आपण इकडे जसे फ्लॅट खरेदी करतो तसे तिथे इन्व्हेस्टमेंट म्हणून बोटी खरेदी करतात. त्यात सर्व सोईकरून घेतात. मधून मधून सिझनमध्ये रहातात. पुढे पुलावर गेलो. हा लायन गेट पूल आहे. तिथून सन सेट पाहिला. बॉल पाण्यात पडल्यासारखे वाटले. तिथे मोठे मालवाहून जहाज आले इतके अजस्त्र होते की त्यावरील माणसे मुंगीसारखी, कार्टून दिसत होती. जेव्हां जहाज जवळ आले तेव्हां मोठा सायरन झाला आणि त्याचा ओको सर्वत्र ऊमटला खूप गम्मत वाटली. त्याचवेळी जहाजांना दिशा दर्शविणारा दिवा पाहिला. एक पिकनिक पॉइंट

पाहून "डेजरन्" या हॉटेलकडे आलो. त्या दिवशी वैशाखी पौर्णिमेचा दिवस होता. पंजाबी लोकांचा सण आम्ही त्या दिवशी पंजाबी जेवण घेतले. शर्मा विश्रांती घेऊन दुसरे दिवशी काही इंडीयन दुकाने पाहिली ~~व परतलो~~ पुन्हां कस्टम, इमिग्रेशन करून "पिझा हट" मध्ये पिझा खाऊन कॉफी घेऊन परतलो.

दुसरे दिवशी समामेल पाहिला मोठा तलाव चहुबाजुनी छोटी वृक्षवेली, स्वच्छ पाणी आणि डोंगरावर बर्फाच्या कडा कलाकाराप्रमाणे, चकाकत होत्या फारच छान वाटले.

(कॅसकोड) सर्वांसाठे रु. स्टोअर वाळ्मा माल मिळतो गाड्या सुद्धा विक्रीला ठेवतात

शनिवारी K. Mart हे डिपार्टमेंटल स्टोअर पाहिले. अमेरिकेत प्रत्येक ठिकाणी शाख्या शाखा आहेत. सर्व प्रकारच्या वस्तू या ठिकाणी मिळतात. आम्ही नातवंडाच्यासाठी छोटी खरेदी केली आणि "गोवळकोंडा" या इंडीयन दाक्षिणात्य रेस्टॉरंटमध्ये इडली - दोसा खाऊन परतलो.

रविवारी संजय-सीमा यांचेकडे नाश्ता करून सर्वजण "I MAX" या थियेटरमध्ये सर्वात मोठ्या स्क्रीनवर (आपल्याकडील सिनेमास्कोपच्या चौपट मोठा) "मिशन टू मार्स" हा सिनेमा पाहिला. तिकीटे घेताना क्यू, बसण्याची उत्तम व्यवस्था सर्व जण बसल्यानंतर सर्वांना O.K विचारून सिनेमा सुरू केला व शेवटी सर्वांना थँक्यू म्हणून निरोप दिला. कुठेही गडबड गोंधळ नाही.

संध्याकाळी स्नोकॅल्मी हा धबधबा पहायला सर्व जण गेलो. धबधबा रुंदीला कमी होता पण उंचीला नायगारापेक्षा जास्त होता. आणि डौलदार होता. सर्व बाजूनी डोंगर असलेमुळे जाणवत होते. सर्वत्र फुले फुलवेली होती. यामधून नदी अतिशय बारीक दिसत होती. ताटव्यातल्यांनी फुलांनी रंग पसरले होते लालच्या जवळच पांढरा, त्याचजवळ पिवळा आणि केशरी लव्हेंडर आणि अंजन शाई ओतल्याप्रमाणे शोभला रंग डोळे तृप्त झाले. फोटोवगैरे काढले ~~आणि~~ त्यानंतर संध्याच्या कॅडरोवर गाडीने संजयकडे आले आणि चहा नाश्ता करून तनुजाच्या गाडीने परतलो.

हे सर्व चालू असतानाच मध्येच दिनशाला

कॅनडाहून फोन आला, (काका, काकू,) तुम्ही माझ्याकडे जरूर या तुमची खूप आठवण येते. न्यूयॉर्कहून अप्पाकाचा फोन आला त्याने आपली चिमुकली लेक बघायला बोलावले होते. अटलांटाहून सीमाने तर एक वीकएंडच माझ्याकडे या तसेच (सॅन फ्रान्सिस्कोला) मनीषानेही बोलावले होते पण आता सर्व ठीकाणी जाणे वेळ आणि नियोजनाप्रमाणे शक्यच नव्हते. माझे भाग्य थोर इतकी सर्व मुले माझ्यावर प्रेम करतात बोलावतात यातच सर्व आले.

संध्याकाळी कुठे जायचे नसले की आमची गाण्याची मैफल जमे. सारंग सुरवात करे अभय पेटी तबला छान वाजवितो अभय तनुजा दोघेही भक्तीसंगीत गातात. तिथे एका मंदीराच्या भूमीपूजन-व भजन समारंभाला आम्ही सर्वजण सहभागी झालो होतो. संजयही तबला छान वाजवितो. तसेच तनुजाची मैत्रीण विजया दिक्षीत यांच्याकडे साईबाबांचे स्थान आहे त्यांच्याकडेही हजेरी लावून आलो. इथे पुस्तकांची मोठी मोठी दुकाने आहेत तिथे तर वाचनाचीही सोय आहे प्रत्यक्ष पुस्तक खरेदी करण्याचे बंधन नाही. इथले भिकारी सुद्धां उत्तम कपडे बूट वगैरे (फाटके असले तरी) घालून हातात वाद्य घेऊन वाजवत उभे राहतात व पैसे मिळवितात त्यांच्या गरीबीतही श्रीमंती दिसून येते.

एकदा मी सारंगला बरे नव्हते म्हणून त्यांच्या बरोबर दवाखान्यांत गेले तर ती इमारत पाहून हा दवाखाना आहे हे खरेच वाटेना. बाहेर सुंदर फुलझाडे, लॉन खेळणी झोपाळे वगैरे, आंत गेल्यावर भरपूर खेळणी, मोठा हॉल माशांचे वेगवेगळ्या आकारांचे पॉट्स, छोटी छोटी लाकडी घरे एका बाजूने आत गेले की खोलवर त्यांत वेगळी खेळणी व दुसऱ्या बाजूने घसरून घसरगुंडीने बाहेर येता येते. तसेच तपासण्याच्या वेगवेगळ्या खोल्या स्वच्छ टेबले त्यावर रंगीबेरंगी टिश्यू. वर बघा खाली बघा म्हणावे लागतच नाही कारण वरही रंगीबेरंगी विमाने, खेळणी. जंगलाची भिंतीवर जनावरांची चित्रे त्यामुळे सर्व गोष्टी सुलभ. अपॉइंटमेंट घेतल्यावेळेत सर्व होऊन जाते. शिवाय डॉक्टर हंसमुख, बोलणे मृदु त्यामुळे तिथे दुखणे पळून जाते.

एकंदरीत अभय तनुजाचा संसार उत्तम चालू आहे. घरांत सर्व सोई असल्यामुळे सर्व गोष्टी सुकर होतात. तनुजाने तर मला सर्व स्वयंपाकघराचे स्वाधीन केले होते. मायक्रोवेव, ओव्हन, फूड प्रोसेसर, हॉट प्लेट व फ्रीज तसेच उत्तम प्रकारच्या व ताज्या भाज्या काही चिरलेल्या स्वरूपात, काही किसलेल्या तसेच वाटाणा, घेवडे वगैरे शिजवलेल्या स्वरूपात मिळतात. दही, दूध, ताक तेल सर्व कॅनमधून उपलब्ध त्यामुळे तिथे गेल्यावर मी आपल्याकडील जिन्नस पोहे, उपमा, साबुदाणा खिचडी, तसेच पुऱ्या पराठे, पुरणपोळ्या, सांज्याच्या पोळ्या

वगैरे आपले पदार्थ करून परदेशांत स्वयंपाक करण्याची हौस फेडून घेतली. आर्द्रता जास्त, कचरा कमी, प्रदूषणविरहीत हवा त्यामुळे थकवा नाही सर्वच वातावरण उत्साहाचे!!

एकंदरीत जीवन धावपळीचे आहे. तनुजाच्या सीमाला वेगवेगळे पदार्थ बनवावेत स्नॅक्स घालावेत, सर्वांना मदत करावी, वेगवेगळी ठिकाणे दाखवावीत, खूप गप्पा करायांत अशी इच्छा असते पण काय म्हणतात तसे "राग थोडा व सोंग फार" अशी अवस्था आहे. स्वतःच्या कामाला वेळेवर जाणे मुलांचे सर्व करणे यांतच दिवस संपून जातो. तसा अभय खूप ॲडजस्ट करणारा आहे. कोणत्याही कामाचा कमीपणा नाही, खाणपिण्याची आवड नाही, अत्यंत शांत साधी रहाणी, कोणताही शौक नाही. त्यामुळे तनुजाला तिच्या प्रगल्भ बुद्धीमत्तेनुसार जितकी संधी देता येईल तितकी देत असतो आणि सारंगवरही त्यांचे संस्कार व्हावेत या साठी धडपड सुरू असते. एकंदर सर्व पाहून खूप समाधान वाटले.

यानंतरच्या अमेरीकेच्या दौऱ्यातील अनुभवलेली, अमेरीकेतील स्वच्छता, संपन्नता, लोकांची कष्ट करण्याची वृत्ती, समाधानी मनोवृत्ती, जीवनाचा उपभोग उत्तमरितीने घेणे, दुसऱ्याशी आदराने वागणे; हे पाहिले की मन भारावून जाते. वैज्ञानीक प्रगती तर स्तिमीत करून टाकते. अंतराळ संशोधनातील आश्चर्यकारक प्रगती, डिस्नेलँड लासवेगास, हॉलीवुड सारखी जुगारी नगरी, ग्रँडकॅनीयनसारखे निसर्गाचे विराट दर्शन, न्यूयॉर्क, शिकागो, वॉशिंग्टन या ठिकाणच्या गगनचुंबी इमारती, कॅलीफोर्नियातील मैलोमैल पसरलेल्या फळांच्या बागा, वॉल्ट डिस्नेचे मॅजिक किंगडम, सी. वर्ल्डमध्ये तर प्रत्यक्ष पाण्यातून

गाड्या सोडल्या आहेत आपण समुद्रातील सर्व हालचाली पाहू शकता. सी वर्ल्डमध्ये माशांचे खेळ दाखविले आहेत. कॅनडातील अतीप्रचंड धबधबा 'नायगारा' १८५ फूट उंच ३५० फूट रुंद अर्धचंद्राकृती सर्व बाजूनी पहायला बोटी, हेलीकॉप्टर, छोट्या गाड्या आहेत. वॉशिंग्टनला J.F.K म्युझीयम, सनफ्रान्सिस्कोचा गोल्डन गेट लासवेगासची रोषणाई, ग्रॅंडकॅनीयन धरणातून नदी वहाते व वरून हेलीकॉप्टरने दाखवितात. वॉशिंग्टनच्या अब्राहम लिंकनचे मेमोरीयल बघताना ऊर भरून येतो. वर्णभेदावर प्रहार करणारा सर्वार्थाने मोठा माणूस व त्यांच्या रोमहर्षक इतिहास साक्षीत उभा आहे. सिनेमाची शूटींग कशी करतात आग लागलेली, अशावर दृश्ये पहातो पण प्रत्यक्ष कशी लागते - म्हणजेच कोणती युक्ती वापरली जाते, भूकंप, उत्पात, प्रलय, धबधबा मोडत असलेला पूल त्यावरून आपली गाडी जाते ते आवाज, सारी प्रात्यक्षिते; अंगावर आली तरी ती खोटी आहेत हे माहित असूनही अंगाचा थरकाप होतो. हे सर्व युनिव्हर्सल स्टुडीओ कडे पहायला मिळते. हॉलीवुड थियेटर २५००० लोक बसू शकतील इतके मोठे आहे. हॉलीवुड जवळ जिथे नटनट्या रहातात तो भाग पाहिला. विज्ञानाची प्रगती इतकी आहे की चॉकलेट किंग्ज्च्या मॅजिक किंगडम मध्ये पूर्वी असलेला जहाजांचा प्रवास, त्यांतील अडचणी, दरोडे, लुटलेली संपत्ती स्त्रियांवरील अत्याचार वगैरे वेगवेगळी दृश्ये वेगवेगळे स्टॉल करून मांडून ठेवली आहेत आणि अंधारातून सरकत्या गाडीने सर्व दाखवितात. प्रत्यक्ष स्त्री-पुरुषांचे हलते पुतळे आहेत आणि सर्व आता घडत आहे असे वाटते. तसेच त्यावेळचे सर्व आवाज टेप करून ठेवले आहेत आणि ती सर्व दृश्ये नाट्यरूपाने आपल्याला पहायला मिळते.

"स्मॉल वर्ल्ड" मध्ये सर्व प्रत्येक देशांची स्टॉल्स आहेत आणि ते बाहुल्यांच्या रूपांत तयार करून ठेवले आहे. आपल्या इंडीयन स्टॉलमध्ये "विवाह समारंभ" दाखविला आहे. पूर्वीच्या गाड्या, मोटारी, सायकली सर्व उत्तमप्रकार जतन करून ठेवले आहे. उद्याचे जग, स्पेस माऊंटन हे तर अद्भुत आहे. अक्षरशः भितीदायक वाटते. तिथे ठिकठिकाणी पाट्या आहेत की ब्लडप्रेशर, हार्ट ट्रबल असणाऱ्यांनी पाहू नये. तसेच शो किती वाजता सुरू होणार व संपणार हे सर्व कॉम्प्युटर वर दिसत होते. हे सर्व आम्ही ३०७८ च्या ४५ दिवसाच्या दौऱ्यातून पाहिले.

अशा प्रकारे सिॲटलमधील वास्तव्यात अमेरीकन जीवनाचे जवळून दर्शन, अमेरीकन दौऱ्यातील उत्तर पूर्व, उत्तर पश्चिम, व दक्षिण पश्चिम विभागांतील प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या. निरोप घेतला.

अमेरिका दौरा आटोपून आम्ही ब्रिटीश एअरवेजने लंडनला "हिथ्रो" विमानतळावर आलो. विकासच्या ऑफिसमधील सौ. मार्जरी आम्हाला भेटायला आली होती ती आम्हाला तिचा नवीन संसार पहायला घरी घेऊन गेली. तिच्या हातचे जेवण जेऊन थोडी विश्रांती घेऊन पुन्हा विमानतळावर आलो. इंडियातून माझे जावई डॉ. विकास व सौ. ज्योती येणार होते. त्यांचे विमानही वेळेवर आले. सर्वांना पाहून आनंद झाला. डॉ. विनोद जोशी हेही मुळगावचे यांना आमची सोय आर्मिंगो साहेब यांचेकडे केली होती. त्यांनी आमचे उत्तम स्वागत केले. इंडियन फूडचा आस्वाद घेऊन विश्रांती घेतली.

दुसरे दिवशी सकाळी भुयारी रेल्वेने (ट्यूब) ऑक्सफर्ड स्ट्रीटकडे आलो. तिथून पिकॅडली सर्कस, पार्लमेंट स्क्वेअर, मार्गारेट चर्च, मार्बल आर्च हे सर्व पाहून रिंगरोडकडे आलो. इथे सर्व गजबजाट होता. हा भाग दुकानांनी भरलेला रहदारीचा होता. या ठिकाणी लिबर्टी बिल्डींग, लहानमुलांच्या सामानाचे डीपार्टमेंटल स्टोअर, मार्कस् ॲंड स्पेन्सर हे स्टोअर्स, क्वीनस ज्युवेलरी शॉप, म्युझिकल इन्स्ट्रुमेंट स्टोअर्स, वॉर्नर ब्रदर्स स्टुडीओ मोठमोठी घड्याळांची दुकाने, इंडीया हाऊस, क्वीन एलिझाबेद हॉल, मोठमोठी चर्चेस पाहिली.

यानंतर सकाळी ११ वाजता बकींगहॅमपॅलेसमध्ये "चेंज ऑफ गार्डस्" हा उपक्रम पाहिला. भरपूर गर्दी होती. लंडन ब्रीज, टॉवर ब्रीज सेंटर, हॅम नॉरसेक बॅंक, गॅंड बॅंक (या इमारतीला सर्व निळ्या काचा आहेत म्हणून ब्ल्यू बॅंक असेही म्हणतात. तसेच मिडलॅंड बॅंक, रिव्हर बॅंक हाऊस, व्हिक्टोरीया बॅंक इत्यादी अत्यंत आकर्षक इमारती पाहिल्या. संध्याकाळी, वेस्टमिनिस्टर ब्रीज, जर्मनी मिनिस्ट्री ऑफ डिफेन्स, रिचमंड हाऊस आणि सोनेरी टेरेस असलेले चर्च पाहिले. व्हीक्टोरीया अंडर ग्राऊंड स्टेशन, हाईड पार्क, सॉमरसेट हॅम, कोपन गार्डनस्,

A.B.C. वर्ल्ड सर्व्हीस ऑफ हॉटेल्स, हॅमिल्टन रोड, इंपिरीयल वॉर म्युझीयम, लॅंबर्थ पॅलेस आणि लंडन ब्रीज अशी ठिकाणे पाहिली. रूळावरून चालणाऱ्या ट्रॅममधून हिंडलो.

यानंतर मादाम "तुसा" हिचे मेणबत्त्यांचे पुतळे असलेले म्युझीयम पाहिले. अत्यंत शिस्तबद्द पद्धतीने व आकर्षक असलेले पुतळे पाहून आश्चर्य वाटले. चेहऱ्यावरील बारीकसारीक भाव, सुरकुत्या, आणि हुबेहुबपणाची वाखाणणी करावी इतकी थोडीच आहे. इंग्लीश, चीनी, जपानी सर्व देशांतील लोकांचे पुतळे आपल्याकडील इंदीरा गांधी, राजीव गांधी, नरसिंहराव यांचेही पुतळे तसेच बोरीसबेकर, डायना, ब्रायन लारा यांचे; हे सर्व धार्मिक स्वाभाव घेऊन वेगवेगळ्या खोल्यातून सजवून ठेवले आहेत. फोटो वगैरे काढण्यास परवानगी असल्यामुळें लोक तोही आनंद लुटत होते. तिथे दोन तीन वॉचमन होते प्रथम आम्हाला वाटले पुतळेच आहेत पण हलल्यावर कळाले इतके साम्य होते. म्युझीयम खूपच आवडली.

चार दिवस खूप हिंडून पाहिले. हजारो वर्षापासून वाढत असलेले हे अवाढव्य शहर आपण केवळ कांही दिवसांत किती पहाणार? फारच थोडे पाहिले म्हणा! वेगळ्या धुंद रंगाचा निसर्ग, नीटनेटकेपणा, आखीवरेखीव रस्ते त्यांना असलेले नंबर, शिस्तबद्द माणसे, ट्यूब सिस्टीम, सर्व ठिकाणी यंत्रांचा वापर ही विशाल प्रगती, कमी माणसांत जास्त काम उद्योग करण्याची वृत्ती. आणि वक्तशीर पणाचे वागणे पाहून मन थक्क होते. समोरील वस्तू आणि ती पहाणं एवढच डोळ्यांचं काम! वस्तू, ठिकाणं, निसर्ग या समृद्धतेने डोळे दिपविले. आणि माझ्या मनांत भावकल्लोळ उठले आणि त्या कल्लोळांत भरपूर आनंद मिळाला.

थोडंसे लंडन दर्शन झाल्यावर आम्ही सकाळी ८ वाजता निघून १० वाजतां पोर्ट ऑफ डोव्हर या ठिकाणी पोहचलो. तिथे चेकींगवगैरे झाले.

पुढे बोटीचा प्रवास आला. खूप मोठी बोट, सर्व सोईंनी युक्त, सर्वत्र गालिचे व भरपूर ड्यूटी फ्री शॉप्स नसेच व्हरायटी टॉईज शॉप्स पाहिली. पुढे येता असता वाटेत बेल्जियम, ब्रुसेल वगैरे छोटी छोटी ठिकाणे लागली. बोटीने हॉलंडला आलो. तिथे ओट फॅक्टरी, आईस फॅक्टरी, चॉकलेट्स, बीअर, फ्रुटबीअर, चेरी बीअर, सी फूडस तयार होत असलेली ठिकाणे पाहिली. मोठमोठी चर्चेस व त्यावरील कलाकुसर, वेगवेगळ्या प्रकारची शिखरे पाहिली. त्यानंतर "मॅक्सम" लागले. इथे सर्वत्र डच भाषा. तशी जर्मनी फ्रेंचही होतीच. ५ मे या दिवशी लिबरेशन डे होता म्हणून त्यांच्या स्मृतीला स्मरून ठिकठिकाणी कार्यक्रम होते. ध्वज अर्धे निम्मे खाली केले होते आणि दरवर्षी त्या वेळी सर्वत्र स्तब्धता पाळली होती. रात्री ८॥ वाजता बोर्डरला पोहोचलो. तिथे जेवण घेतले. इकडे ट्यूलीप्सची भरपूर झाडे असलेला ट्यूलिप्स पार्क पाहिला. "ऑरेंज कलर हा हॉलंडचा नॅशनल कलर त्यामुळे बऱ्याच वस्तू त्या कलरमध्ये आहेत. रात्री आठ वाजून गेले तरी सूर्यास्त झाला नव्हता व ९ वाजून गेले तरी डिपार्टमेंटल स्टोअर्स उघडेच होती. काही डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये तर टाचणी पासून गाडी पर्यंत वस्तू विक्रीला ठेवलेल्या असून सेल्फ सर्व्हीस फक्त काऊंटरवर येऊन थेवायचे बिल केले जाते.

हॉलंडमध्ये ७०० फूट लांबी-रुंदीचा डॅम पाहिला हा हॉलंडचा मध्यभाग. इथे डच फ्रेंच भाषा बोलली जाते. हे सर्व कालव्यांचे शहर आहे. कालवे भरपूर आणि ठिकठिकाणी विंडमिल्स. वीजनिर्मिती व फ्रेश हवा या साठी प्रसिद्ध. इथे मोठमोठी स्टेडियम्स आहेत वर्षभर हॉकी कॉम्पिटीशनस व फुटबॉल कॉम्पिटीशनस होत असतात.

लवकरच ॲमस्टरडॅमला येऊन पोहोचलो इथे हा मोठा नॉर्थ सी. प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे पूल पाहिले. ओळे ठिकाणी सर्व. कमानी आणून दिसत होत्या.

सौंदर्य स्वरूपच छान होते. जवळ जवळ तासभर बोटींग केले. इथल्या गाई प्रसिद्ध पांढर्‍याशुभ्र व त्यावर काळे ठिपके. त्यामुळे दूध भरपूर व चीज प्रसिद्ध. दुसरे दिवशी आम्ही हिर्‍यांचा कारखाना आणि म्युझियम पाहिले. चीज फॅक्टरी, लाकूड खेळणींचे तसेच मोठ मोठी विमाने तयार करण्याचे कारखाने पाहिले. हे माऊंटनस्, मोनॅकम् डम्, हाऊसबोटी, सेंट्रल पार्क पाहिला. तसेच पाण्यामधून तयार केलेल्या बोगद्यातून ट्रेनने प्रवास केला.

ॲमस्टरडॅममध्ये संध्याकाळी रेल्वेवरून चालणाऱ्या ट्रेम मधून हिंडलो. रॉयल पॅलेस, मगाना पॅलेस, शॉपिंग सेंटर वगैरे पाहिले. इथे १७०० सालेपेक्षाही पूर्वीच्या चित्रांचे म्युझियम पाहिले. नाईटवॉच हे चित्रसंग्रहालय फारच छान आहे. प्रसिद्ध चित्रकार रेंब्रॉंट याचे आहे. इतरही भरपूर आहेत पण नाईटवॉचला तोड नाही. या चित्रांत प्रत्येकाची कसोटी पहाणारा दहा पंधरा जणांचा घोळका आहे, आणिबाणीचा प्रसंग, सर्वांच्या चेहऱ्यावरचे भाव, ते सर्वांच्या शरीरावर मनांवर, डोळ्यांत, हातांच्या हालचालीत उमटणारे आहेत. राग चीड, सूड, संताप, भय, चिंता, आत्मसंरक्षण, पलायन, अचानक हल्ला, त्यांना तोंड कसे द्यायचे; याचा गर्भीमान विचार, इत्यादि भाव त्या प्रौढ व्यक्तींच्या अंगोपांगावर उमटले आहेत. या सर्वांचा पडताळा या चित्रातून येतो. भाव इतके प्रत्ययकारी आहेत की क्षणभर आपणही त्यांत सामील झाल्याचा आभास होतो. त्यामुळे रेंब्रॉंटला मी मनोमन अभिवादन करते. दुसरे असे व्हीन्सेंट व्हॅन या चित्रांचा अनुभव - चित्रकार म्हणून रसिकाला व्याकूळ करणारं आहे. काही गुणी कलावंत अनेक कलागुण जवळ असूनही व्यवहारांत अपयशी ठरतात, त्याचा परिणाम कलेवर होतो. हा कलाकार (व्हॅन गॉफ) ग्रामीण व दरिद्री चित्रकार पण हाती कला उत्तम! आहेत त्या पद्धतीने माणसे रंगविण्याकडे कल अधिक आणि मंद प्रकृतीचे रंग (डल कलर्स) आहेत. सुगीचं "हॉर्वेस्ट" हे चित्र आहे ते निसर्ग, रान, पीक यांच्या स्वाभाविक जगांत घेऊन जाते.

१६०० वर्षांपूर्वीचे चर्च पाहिले. ~~प्राणी लाईफ डेंजरस म्हणून त्यांचे लाईफ इन्शुअरन्स करतात~~ येथील पोस्टऑफीस पाहून फोन कार्ड घेतले. रेल्वेस्टेशन हे सेंट्रलपार्क म्हणून ओळखतात हे कृत्रीम बेट उभे करून केले आहे. कॅथेलिक चर्चेसही भरपूर आहेत.

"हेग हे आंतरराष्ट्रीय ऑफीसेस असलेले ठिकाण. हे सेंट्रल स्टेशन जवळच आहे. सिनेगार चर्च हे प्रसिद्ध असून इथे लोइट न वापरतां कँडलस लावतात. मध्ये ठीकठिकाणी कालव्यावर ॲटोमॅटिक कृत्रीम रस्ता केला आहे जेव्हां स्टोर जायचे असते तेव्हां सिग्नल देऊन वर उचलला जातो व नंतर पूर्ववत करतात. पूर्वी रामेश्वरला पंबन पुलावर अशी योजना केली होती.

येथील "झू" प्रसिद्ध आहे सर्व प्रकारचे प्राणी आहेत परंतु हवामानाच्या बदलानुसार त्यांची व्यवस्था ठेवली जाते. प्राणी लाइफ डेंजरस म्हणून त्यांचे लाइफ इन्शुअरन्स करतात. रस्त्यावर घरी दारी पशुपक्षी दिसत नाहीत फक्त घरगुती पाळीव मांजरे नेहडी दिसतात. लहान मुलांची म्यूझियम आहे तेथील वैशिष्ट्य म्हणजे वस्तूला मुले हात लावू शकतात. ॲमस्टरडॅमला एक उत्कृष्ठ आलिशान हॉटेल आहे त्याचे एका दिवसाचे खोलीभाडेच १००० गिल्डर्स आहे. तसेच इथे बोटीतही लोक रहातात. हेबीटॅट या नांवाचे एक डिपार्टमेंटल स्टोअर पाहिले. संध्याकाळी "युरोस्टार" या समुद्राच्या पाण्यातून बोगद्यातून गेलेल्या रेल्वेतून परत निघालो. सर्व भुयारांतून आणि आरामदायी प्रवास केला. ब्रुसेल्स येथे रेल्वे बदलली पुन्हां चेकींग वगैरे झाले व युरोस्टारने लंडन रेल्वेस्थानकावर आलो.

रात्री आठ वाजतां यामिनी सोबत यांचेकडे येऊन जेवण वगैरे घेतले. त्यांनी आमची ब्रिटीश एअरवेजची तिकीटे o.k. करून ठेवली होती. माझी मुलगी व जावई यानंतर डॉन कॅस्टर हॉस्पिटलला उच्चशिक्षणासाठी दुसरे दिवशी रवाना झाले व आम्ही "हिथ्रो" एअरपोर्टवर आलो बॅगेज क्लेम करून ड्यूटी फ्री शॉपमध्ये फेरफटका मारून परत गेटजवळ आलो इथून विमानापर्यंत २०-२५ मिनिटे चालावे लागते म्हणून ६० वयावरील लोकांसाठी टूर्सीटर छोट्या छोट्या गाड्या आहेत त्यातून

विमानापर्यंत आलो, वेळेवर सुटले. सहार एअरपोर्टवर सुखरूप आलो. कोणताही प्रवास म्हटल्यावर धावपळ आलीच तथापी S.O.T.C, T.C.I सीता वगैरे सारख्या टूर कंपनीतून प्रवास केल्यास आपल्यासारख्या वयस्कर व्यक्तींना, हा सर्व प्रवास अत्यंत सुखकर होतो असा असा माझा अनुभव आहे. कारण या कंपन्या आपले भारतीय ~~केवळ~~ भोजन रहाण्याची व्यवस्था व प्रेक्षणीय स्थळे विनासायास दाखविण्याची सुंदर व्यवस्था करतात. तसे व्हिसा घेऊन प्रवास करणे काटकसरीचे कमी खर्चाचे आहे पण तरुण वयांत श्रेयस्कर. शेवटी माझी मातृभूमी, भारत, महाराष्ट्र व पुणे येथील जिव्हाळ्याची सर कोठेही येऊ शकत नाही. नेत्रसुखास परदेश प्रवास व आत्मसुखास पुण्यनगरी हेच खरे! सहार ते पुणे असा Sandy कंपनीच्या गाडीने पहाटे ३॥ वाजतां घरी आलो आणि चि. विकासने वेलकम टु इंडिया म्हणून स्वागत केले.

— सौ. आशा जोशी
कोथरूड २९ पुणे